# SSR_3.2.2 Workshop On Media And UG Syllabus




CS Scanned with CamScanner

श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित,

# यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर,

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) आणि मराठी विभाग
व मराठी अभ्यास मंडळ,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,कोल्हापूर

## एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार

## 'प्रसारमाध्यमे आणि पदवी अभ्यासक्रम'

YASHWANTRAO CHAVAN WARANA MAHAVIDYALAYA ★ WARANANAGAR (KOLHAPUR)

## कार्यक्रम पत्रिका

✶ उदघाटक : **प्रो.डॉ.सौ.वासंती रासम**
प्रशासकीय अधिकारी, श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगर

✶ अध्यक्ष : **प्रो.डॉ. प्रकाश चिकुर्डेकर**
प्र.प्राचार्य, य. च. वारणा महाविद्यालय, वारणानगर.

✶ प्रमुख मार्गदर्शक : **मा.निखिल पंडितराव**
निवासी संपादक, दैनिक सकाळ ,कोल्हापूर

✶ विशेष उपस्थिती : मा.प्रा.डॉ. दत्ता पाटील
अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
मा.प्रा.डॉ. प्रकाश दुकळे
अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

✶ स्वागत व प्रास्ताविक : प्रा.डॉ. सुधाकर खोत
समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC)

✶ पाहुण्यांचा परिचय : **प्रा.डॉ. सर्जेराव जाधव**
वेबिनार समन्वयक व मराठी विभागप्रमुख

✶ आभार : **प्रा.डॉ.भीमराव वानोळे**
वेबिनार सहसमन्वयक

✶ स्थळ /माध्यम : वेबिनार लिंक–https://meet.google.com/zmk-ftjt-fih

**शनिवार दि. ०७ ऑगस्ट २०२१**

**वेळ : सकाळी ११:३0 वाजता**

Scanned with CamScanner


12:43
zmk-ftjt-fih
REC
kalpana
Manasi
Arvind
Varad
sudars...
Bhagw...
You
77 others

सकाळ

# राष्ट्रउभारणीत प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची

## निखिल पंडितराव : वारणा महाविद्यालयात ऑनलाईन राष्ट्रीय अधिवेशन

वारणानगर, ता. ७ : "स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरही प्रसारमाध्यमांनी आपली ओळख कायम ठेवली असून, राष्ट्रउभारणीच्या कार्यात प्रसारमाध्यमांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे," असे मत 'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव यांनी व्यक्त केले.

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ आणि शिक्षक संघातर्फे 'प्रसारमाध्यमे आणि पदवी अभ्यासक्रम' या विषयावरचे एक दिवसाचे राष्ट्रीय अधिवेशन ऑनलाईन पद्धतीने झाले, त्यावेळी श्री. पंडितराव प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर होते.

श्री. पंडितराव म्हणाले, "'सकाळ' हे निरपेक्ष वृत्तीने काम करणारे दैनिक असून प्रबोधनाबरोबरीने आपत्तीत सर्वसामान्यांसाठी मदत करण्याचे कार्यही 'सकाळ' अविरतपणे करत आले आहे. 'सकाळ' हे सामाजिक उपक्रमांत अग्रेसर असणारे महाराष्ट्रातील एकमेव दैनिक आहे."



वारणानगर : येथील वारणा महाविद्यालयात मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ आणि शिक्षक संघातर्फे 'प्रसारमाध्यमे आणि पदवी अभ्यासक्रम' या विषयावरील राष्ट्रीय अधिवेशनात ऑनलाईन बोलताना 'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव.

### प्रसारमाध्यमांवर बंधने चिंताजनक

श्री. पंडितराव म्हणाले, "समाजातील वेदनांची आणि भावनांची दखल पत्रकारितेत घेतली पाहिजे. पत्रकारितेचा अभ्यास करत असताना तत्त्वज्ञानाचा अभ्यासही या क्षेत्रात येणाऱ्या तरुणांनी केला पाहिजे. महाविद्यालयीन जीवनात प्रसारमाध्यमावरील अभ्यास गरजेचा आहे. प्रसारमाध्यमांवर कायद्याच्या माध्यमातून काही बंधने लादली जाण्याचा प्रयत्न चिंताजनक आहे."

ते म्हणाले, "विशेषतः जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आणि कोरोना महामारीच्या कालखंडात विषय, विचार आणि प्रश्न यांचे स्वरूप बदलले असले तरी प्रसारमाध्यमांचा मूळ ढाचा जसाच्या तसाच राहिला आहे. टीव्ही, डिजिटल युग आले तरी पत्रकारितेचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून केलेली पत्रकारिता शाश्वत आहे."

अधिवेशनात देशभरातून चारशेहून अधिक प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक सहभागी झाले होते. आमदार डॉ. विनय कोरे, प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. वासंती रासम यांनी शुभेच्छा दिल्या. नॅक समन्वयक डॉ. सुधाकर खोत यांनी स्वागत केले. संयोजक डॉ. एस. एस. जाधव यांनी परिचय करून दिला. डॉ. दत्ता पाटील, डॉ. प्रकाश दुकळे उपस्थित होते. डॉ. भीमराव यानोळे यांनी आभार मानले.

Kolhapur, Kolhapur-Today
08/09/2021 Page No. 3